भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# तेलक्षेत्र (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८

(सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ५३)

[ दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान ]

# The Oilfields ( Regulation and Development ) Act, 1948

**(Act No. 53 of 1948)**

[As in force on the 28th February 1994]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९४
[ किंमत : रु. २.४० पैसे ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान असलेला ऑईल फिल्ड्स (रेग्युलेशन अॅन्ड डेव्हलपमेंट) अॅक्ट, १९४८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ५, अंक २, दिनांक ३० जून १९९४ यात पृष्ठ ६० ते ६४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**के. एल. मोहनपुरिया**
सचिव, भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक ३० जून १९९४.

---

## PREFACE

This edition of the Oilfields (Regulation and Development) Act, 1948 as on the 28th February 1994, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary Part XII, section 1, No. 2, Vol. 5, dated 30th June 1994 on pages 60 to 64.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Dated 30th June 1994.

# तेलक्षेत्र (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८

कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. [निरसित].

३. व्याख्या.

४. कोणताही खाणकाम पट्टा या अधिनियमास अनुसरून असल्याखेरीज तो विधिग्राह्य नाही.

५. खाणकाम पट्ट्यांच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

६. खनिज तेलाचा विकास करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.

६क. खनिज तेलांच्या बाबतीतील स्वामित्वधन.

७. विद्यमान पट्ट्यांमध्ये फेरबदल करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.

८. प्रत्यायोजन.

९. शिक्षा.

१०. नियम आणि अधिसूचना संसदेपुढे मांडणे.

११. तपासणी करण्याची शक्ती.

१२. विशेष प्रकरणांत नियम शिथिल करणे.

१३. अधिनियम शासनावर बंधनकारक असणे.

१४. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

अनुसूची.

**शब्दसूची—**

मराठी-इंग्रजी

इंग्रजी-मराठी

# [1][तेलक्षेत्र] (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८

(सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ५३)

[दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान]

[८ सप्टेंबर, १९४८]

[1]तेलक्षेत्रांचे विनियमन करण्यासाठी आणि खनिज तेलाच्या साधनसंपत्तीचा विकास करण्यासाठी उपबंध करण्यासाठी नियम.

ज्याअर्थी, [2][लोकहिताच्या दृष्टीने] [3]* * * तेलक्षेत्रांचे विनियमन करण्यासाठी आणि [3][खनिज तेलाच्या साधनसंपत्तीचा] विकास करण्यासाठी उपबंध करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास [1]["तेलक्षेत्र] (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८" असे म्हणता येईल.

[5] (२) त्याचा विस्तार [6]* * * संपूर्ण भारतभर आहे.]

(३) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत नेमून देईल त्या दिनांकास[7] तो अंमलात येईल.

२. [केंद्र शासनाच्या नियंत्रणाच्या इष्टतेबाबतची घोषणा] खाण व खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याचे कलम ३२ व अनुसूची यांद्वारे निरसित (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

व्याख्या.

३. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काहीही नसेल तर, या अधिनियमात :—

(क) "पट्टाकार" आणि "पट्टेदार" या शब्दप्रयोगांमध्ये, अनुक्रमे, लायसनदाता आणि लायसनधारक यांचा समावेश होतो;

(ख) "खाण" या शब्दाचा अर्थ, [3][खनिज तेलाचा] शोध घेण्याच्या किंवा असे तेल मिळवण्याच्या प्रयोजनार्थ केलेले कोणतेही उत्खनन असा आहे, आणि त्या शब्दात तेलविहिरीचा समावेश होतो;

(ग) [3]["खनिज तेले"] या शब्दप्रयोगात नैसर्गिक वायू व पेट्रोलियम यांचा समावेश होतो;

(घ) "खाणकाम पट्टा" या शब्दप्रयोगाचा अर्थ, [3][खनिज तेलांचा] शोध घेण्यासाठी, ती नमुन्यादाखल निष्कर्षिण्यासाठी त्याकरिता व्यापक प्रमाणावर खाणकाम करण्यासाठी, ती प्राप्त करण्यासाठी, त्यांना विक्रययोग्य बनवण्यासाठी, त्यांची ने-आण करण्यासाठी किंवा विल्हेवाट लावण्यासाठी किंवा त्या गोष्टींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी दिलेला पट्टा असा आहे, आणि त्या शब्दप्रयोगात, समन्वेषण लायसन किंवा पूर्वेक्षण लायसन याचा समावेश होतो;

(ङ) "तेलक्षेत्र" या शब्दाचा अर्थ, ज्या क्षेत्रात नैसर्गिक वायू व पेट्रोलियम, अशोधित तेल (क्रूड ऑईल), परिष्कृत तेल, अंशतः परिष्कृत केलेले तेल आणि पेट्रोलियमजन्य पदार्थांपैकी कोणतेही द्रव किंवा घन स्थितीतील पदार्थ मिळवण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही कामे चालवावयाची आहेत किंवा चालवण्यात येत आहेत असे कोणतेही क्षेत्र असा आहे.

---

१. १९५७ चा अधिनियम ६७ यांचे कलम ३२ व तिसरी अनुसूची यांद्वारे "खाण व खनिज" याऐवजी घातले (दिनांक १ जून, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाद्वारे "खाण व" हे शब्द वगळण्यात आले (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाद्वारे "खनिज" याऐवजी घातले (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाद्वारे "यात यापुढे विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत" हा मजकूर वगळण्यात आला (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे पूर्वीच्या पोटकलमाऐवजी घातले.

६. १९५७ चा अधिनियम ६७ याचे कलम ३२ व तिसरी अनुसूची यांद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य वगळता" हा मजकूर वगळण्यात आला (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

७. २५ ऑक्टोबर १९४९, अधिसूचना क्रमांक एम. दोन १५५(२४)-एक, दिनांक ८ ऑक्टोबर १९४९ (**भारताचे राजपत्र**, असाधारण, १९४९ पृष्ठ २०७५).

एच ४२८६—२(१०२१—११-९४)

कोणताही खाणकाम पट्टा या अधिनियमास अनुसरून असल्याखेरीज तो विधिग्राह्य नाही.

४. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर या अधिनियमाखाली केलेल्या नियमांस अनुसरून असल्याखेरीज अन्यथा कोणताही खाणकाम पट्टा देता येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांविरुद्ध दिलेला कोणताही खाणकाम पट्टा शून्य व प्रभावहीन ठरेल.

खाणकाम पट्ट्यांच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

५. (१) केंद्र सरकार खाणकाम पट्टे देण्याचे विनियमन करण्यासाठी किंवा कोणत्याही [1][खनिज तेलाच्या] संबंधात किंवा कोणत्याही क्षेत्रात असे पट्टे देण्यास प्रतिबंध करण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, [2][नियम] करू शकेल.

(२) विशेषतः आणि वरील शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी असे नियम करता येतील :—

(क) कशा रीतीने, कोणत्या [1][खनिज तेलांच्या] किंवा क्षेत्रांच्या बाबतीत आणि कोणत्या व्यक्तींना खाणकाम पट्ट्यांसाठी अर्ज करता येईल ते, आणि अशा अर्जांसोबत द्यावयाची फी;

(ख) कोणत्या प्राधिकरणास, कोणत्या अटींवर आणि कोणत्या शर्तींच्या अधीनतेने असे खाणकाम पट्टे देता येतील;

(ग) किती कमाल किंवा किमान क्षेत्रासाठी आणि किती मुदतीसाठी कोणताही खाणकाम पट्टा देता येईल, आणि कोणत्या अटींवर सलग क्षेत्रांच्या संबंधातील पट्ट्यांचे एकत्रीकरण करता येईल;

(घ) पट्टेदाराने द्यावयाचे कमाल व किमान भाडे निश्चित करणे—मग तेथे खाणकाम चालू असो वा नसो.

खनिज तेलाचा विकास करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.

६. (१) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, [1][खनिज तेलांचे] संरक्षण व विकास करण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषतः, आणि वरील शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी असे नियम करता येतील :—

[3](क) * * * * * *

(ख) * * * * * *

(ग) कोणतीही इंजिने, यंत्रसामग्री किंवा इतर साधनसामग्री यांचा वापर विहित करून किंवा तो विनियमित करून कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही [4][खनिज तेलाच्या साधनसंपत्तीचा] विकास करणे;

(घ) एखाद्या तेलक्षेत्रात तेल विहिरींचे विंधण करणे, पुन्हा विंधण करणे, त्या खोल करणे, बंद करणे, त्यांना प्लग करणे आणि त्या सोडून देणे या गोष्टी विनियमित करणे आणि अशा कामांवर मर्यादा घालणे किंवा त्यास प्रतिबंध करणे आणि तेल वाया जाऊ नये किंवा त्यास नुकसान पोहचू नये म्हणून सुधारात्मक उपाययोजना हाती घेणे;

(ङ) कोणत्याही तेलक्षेत्रात तेलाचे उत्पादन करण्याच्या पद्धतींचे विनियमन करणे, आणि अशा पद्धतींवर मर्यादा घालणे किंवा त्यांना प्रतिबंध करणे;

(च) सर्व नवीन विंधणकामे (बोअरिंग्ज) आणि कूपकांची खोदकामे (शॅफ्ट सिंकिंग्ज) सक्तीने अधिसूचित करणे, आणि विंधणकामाचे कागदपत्र व सर्व नवीन विंधणविवरांच्या क्रोड-भागांचे (कोअर्स) नमुने जतन करून ठेवणे;

(छ) खाणी आणि नवीन विंधणविवरे यांतून नमुने घेणे ;

(ज) [1][खनिज तेले] साठवून ठेवण्याकरिता करावयाच्या व्यवस्थेचे आणि कोणत्याही व्यक्तीस अशा तेलांचा किती साठा ठेवता येईल त्याबाबत विनियमन करणे ;

---

१. १९५७ चा अधिनियम ६७ याच्या कलम ३२ व ३ री अनुसूची याद्वारे "खनिज" याऐवजी घातले (दिनांक १ जून, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. खनिज सवलत नियम, १९४९ साठी भारताचे राजपत्र, १९४९, भाग एक पृष्ठ २०७५ आणि पेट्रोलियम सवलत नियम, १९४९, साठी उपरोक्त असाधारण राजपत्र, पृष्ठ २७१३ पहा.

३. १९५७ चा अधिनियम ६७ याच्या कलम ३२ व ३ री अनुसूची याद्वारे "खंड (क) व (ख)" वगळण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३२ व ३ री अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

[१][ (ञ) खाणीतून काढलेल्या, दगडखाणीतून काढलेल्या, उत्खनन करून मिळवलेल्या, किंवा संग्रह केलेल्या खनिज तेलांच्या बाबतीत स्वामित्वधन वसूल करणे, आणि त्यावर फी किंवा कर आकारणे व ते वसूल करणे ; ]

(ट्) खाणींच्या मालकांनी किंवा पट्टेदारांनी विशेष किंवा नियतकालिक प्रतिवेदने व अहवाल सादर करणे, आणि अशी प्रतिवेदने व अहवाल कोणत्या नमुन्यात व कोणत्या प्राधिकरणाकडे सादर केले पाहिजेत ते.

[२][ ६क. (१) "तेलक्षेत्र (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९६९" याच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेला खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती, अशा खाणकाम पट्ट्याच्या संलेखामध्ये किंवा अशा प्रारंभाच्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, अशा प्रारंभानंतर तिने पट्ट्याच्या क्षेत्रातील खाणीतून काढलेल्या, दगडखाणीतून काढलेल्या, अशा क्षेत्रात उत्खनन करून मिळवलेल्या किंवा संग्रह केलेल्या कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीत, त्या खनिज तेलासंबंधी अनुसूचीत त्या त्या वेळी जो दर विनिर्दिष्ट केला असेल त्या दराने स्वामित्वधन देईल. खनिज तेलांच्या बाबतीतील स्वामित्वधन.

(२) "तेलक्षेत्र (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९६९" याच्या प्रारंभास किंवा त्यानंतर देण्यात आलेला खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती, तिने पट्ट्याच्या क्षेत्रातील खाणीतून काढलेल्या, दगडखाणीतून काढलेल्या, अशा क्षेत्रात उत्खनन करून मिळवलेल्या किंवा संग्रह केलेल्या कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीत, त्या खनिज तेलासंबंधी अनुसूचीत त्या त्या वेळी जो दर विनिर्दिष्ट केला असेल त्या दराने स्वामित्वधन देईल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, अपरिहार्यपणे वाया जाणाऱ्या किंवा टाकीत परत पाठवण्यात येणाऱ्या किंवा पेट्रोलियम किंवा नैसर्गिक वायू यांचे किंवा या दोन्हींचे उत्पादन करताना विधणकाम किंवा अन्य काम करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अशोधित तेलाच्या, केसिंग शीर्ष द्रवणाच्या (केसिंगहेड कन्डेन्सेट) किंवा नैसर्गिक वायूच्या संबंधात कोणतेही स्वामित्वधन देय होणार नाही.

(४) कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीत ज्या दराने स्वामित्वधन प्रदेय असेल तो दर वाढवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी, केंद्र सरकारास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीत नमूद करण्यात येईल त्या दिनांकास व तेव्हापासून अनुसूचीत विशोधन करता येईल :

परंतु, केंद्र सरकारास,—

(क) कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीतील स्वामित्वधनाचा दर तेलक्षेत्रामध्ये किंवा प्रकरणपरत्वे, तेलविहीरीच्या ठिकाणी त्या खनिज तेलाची जी विक्रीची किंमत असेल त्या किंमतीच्या वीस टक्क्यांहून अधिक होईल अशा रीतीने निश्चित करता येणार नाही ; किंवा

(ख) कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीतील स्वामित्वधनाचा दर [३][तीन] वर्षांच्या कोणत्याही कालावधीमध्ये एकापेक्षा अधिक वेळा वाढवता येणार नाही.]

७. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेला कोणताही खाणकाम पट्टा कलमे ५ व ६ अन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधांशी अनुरूप करून घेण्याच्या दृष्टीने त्या पट्ट्याच्या अटी व शर्ती यांमध्ये फेरफार किंवा बदल करण्यासाठी केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल; विद्यमान पट्ट्यामध्ये फेरबदल करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.

परंतु, अशा रीतीने केलेल्या ज्या कोणत्याही नियमांमध्ये पोटकलम (२) खंड (ग) यात नमूद केलेल्या बाबींसाठी तरतूद करण्यात आली असेल, अशा कोणत्याही नियमांना फेरबदलांनिशी किंवा फेरबदलांवाचून [४][लोकसभेची] मान्यता मिळेपर्यंत ते अंमलात येणार नाहीत.

(२) पोटकलम (१) अन्वये केलेल्या नियमांत पुढील बाबींसाठी तरतूद करण्यात येईल :—

(क) अशा नियमान्वये करावयाच्या नियोजित फेरफारांची किंवा बदलांची पट्टेदारास आणि पट्टाकार म्हणजे केंद्र सरकार नसेल त्या बाबतीत, पट्टाकारासदेखील आगाऊ नोटीस देऊन त्यांना अशा प्रस्तावाविरुद्ध कारण दाखवण्याची संधी देणे;

(ख) नियोजित फेरफारांमुळे किंवा बदलांमुळे ज्या पक्षकाराचा लाभ होत असेल त्या पक्षकाराने, अशा फेरफारांमुळे किंवा बदलांमुळे ज्या पक्षकाराच्या विद्यमान पट्ट्याखाली असलेल्या हक्कांवर प्रतिकूल परिणाम होईल त्या पक्षकारास भरपाई देणे; आणि

(ग) उक्त भरपाई कोणत्या तत्त्वावर, अशा रीतीने आणि कोणत्या प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल ते.

---

१. १९६९ चा अधिनियम ३९ याच्या कलम २ द्वारे समाविष्ट केले.
२. वरील अधिनियमाद्वारे समाविष्ट केले.
३. १९८४ चा अधिनियम २०, कलम २ द्वारे 'चार' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे ऐवजी घातले.

**प्रत्यायोजन.** ८. केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमान्वये त्यास वापरता येण्याजोगी कोणतीही शक्ती, अशा अधिसूचनेत कोणत्याही शर्ती विनिर्दिष्ट करण्यात आल्या तर, त्या शर्तींच्या अधीनतेने, अशा निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास वापरता येईल.

**शिक्षा.** ९. (१) या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधान्वये केलेल्या कोणत्याही नियमात अशी तरतूद करता येईल की, अशा नियमाचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन केल्याबद्दल कोणतीही व्यक्ती सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा या दोन्हीही शिक्षांस पात्र ठरेल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीस दोषी ठरवण्यात आल्यानंतर जर ती व्यक्ती असा अपराध करण्याचे चालू ठेवील तर अशा प्रसंगी, त्या व्यक्तीस पहिल्यांदा दोषी ठरवण्यात आल्याच्या दिनांकानंतर ज्या ज्या दिवशी ती व्यक्ती असा अपराध करण्याचे चालू ठेवील त्या प्रत्येक दिवसाबद्दल ती, शंभर रुपयांपर्यंत असु शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

**नियम आणि अधिसूचना संसदेपुढे मांडणे.** [१][१०. या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम व कलम ६-क च्या पोटकलम (४) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना ही असा नियम किंवा अशी अधिसूचना करण्यात किंवा काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, त्याचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता ठेवण्यात आली पाहिजे आणि उपरोक्त अधिवेशनाच्या किंवा अशा क्रमवर्ती अधिवेशनांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी अशा नियमात किंवा अधिसूचनेत कोणताही बदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा ती अधिसूचना अशा बदललेल्या स्वरूपातच परिणामक होईल, अथवा असा नियम किंवा अशी अधिसूचना करण्यात किंवा काढण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम किंवा ती अधिसूचना मुळीच परिणामकारक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही बदलामुळे किंवा विलोपनामुळे तत्पूर्वी त्या नियमान्वये किंवा अधिसूचनेन्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

**तपासणी करण्याची शक्ती.** ११. (१) कोणत्याही खाणीच्या किंवा सोडून दिलेल्या खाणीच्या प्रत्यक्ष किंवा संभाव्य खाणकामाच्या स्थितीची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी अथवा या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत नमूद केलेल्या अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी केंद्र सरकारने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास पुढील गोष्टी करण्याचा अधिकार असेल :—

(क) कोणत्याही खाणीत प्रवेश करणे आणि तिची तपासणी करणे;

(ख) कोणत्याही खाणीवर नियंत्रण असलेल्या किंवा अशा खाणीशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा अधिकाराखाली असलेला कोणताही दस्तऐवज, पुस्तक, नोंदवही किंवा अभिलेख हजर करण्यास फर्माविणे;

(ग) कोणत्याही खाणीवर नियंत्रण असलेल्या किंवा अशा खाणीशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीची तपासणी करणे.

(२) पोटकलम (१) अन्वये केंद्र सरकारने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे असे मानले जाईल.

**विशेष प्रकरणात नियम शिथिल करणे.** १२. एखाद्या प्रकरणात, कलमे ५ व ६ अन्वये केलेल्या नियमांमध्ये घालून दिलेल्या अटी व शर्ती यापेक्षा निराळ्या अटींवर व शर्तींवर खाणकाम पट्टा मंजूर करण्यास किंवा खाणकाम करण्यास प्राधिकृती देणे लोकहिताच्या दृष्टीने योग्य होईल अशी केंद्र सरकारची खात्री झाली असेल तर, त्यास अशा कोणत्याही प्रकरणात तसे करता येईल.

**अधिनियम शासनावर बंधनकारक असणे.** [२][१३. या अधिनियमाचे उपबंध शासनावर बंधनकारक असतील.]

**सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.** १४. या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही चालणार नाही.

---

१. १९८४ चा अधिनियम २० कलम ३ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे दाखल केले.

# [1][अनुसूची

(कलम ६ क पहा)

स्वामित्वधनाचा दर

(१) अशोधित तेल .. .. प्रत्येक मेट्रिक टनामागे [2][ बेचाळीस रुपये.]

(२) केसिंग शीर्ष द्रवण (केसिंग हेड कन्डेन्सेट) .. प्रत्येक मेट्रिक टनामागे [2][ बेचाळीस रुपये.]

(३) नैसर्गिक वायू .. .. विहिरीच्या ठिकाणी नैसर्गिक वायूचे जे मूल्य असेल त्याच्या दहा टक्के.]

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "केंद्रीय विधान मंडळ" याऐवजी घातले.

२. १९८४ चा अधिनियम, २० याच्या कलम ३ द्वारे ऐवजी घातले.

# तेलक्षेत्र (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८

# THE OILFIELDS (REGULATION AND DEVELOPMENT) ACT, 1948

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| कूपकांचे खोदकाम | shaft sinking | .. [क. ६ (च्)] |
| क्रोडभाग | core | .. [क. ६ (च्)] |
| खनिज तेले | mineral oils | .. [क. ३ (ग्)] |
| खाणकाम पट्टा | mining lease | .. [क. ३ (घ्)] |
| तेलक्षेत्र | oilfield | .. [क. ३ (ङ्)] |
| नमुन्यादाखल निष्कर्षिणे | winning | .. [क. ३ (घ्)] |
| पट्टाकार | lessor | .. [क. ३ (क्)] |
| पट्टेदार | lessee | .. [क. ३ (क्)] |
| पुन्हा विंधण करणे | redrilling | .. [क. ६ (घ्)] |
| पूर्वेक्षण लायसन | prospecting licence | .. [क. ३ (घ्)[ |
| प्लग करणे | plugging | .. [क. ६ (घ्)] |
| लायसनदाता | licensor | .. [क. ३ (क्)] |
| लायसनधारक | licensee | .. [क. ३ (क्)] |
| विक्रययोग्य | merchantable | .. [क. ३ (घ्)] |
| विंधण करणे | drilling | .. [क. ६ (घ्)] |
| विंधणकाम | boring | .. [क. ६ (च्)] |
| विंधणविवर | bore-hole | .. [क. ६ (च्)] |
| व्यापक प्रमाणावर खाणकाम करणे | working | .. [क. ३ (घ्)] |
| समन्वेषण लायसन | exploring licence | .. [क. ३ (घ्)] |
| संरक्षण | conservation | .. [क. ६ (१)] |
| साधनसंपत्ती | resources | .. [(उद्देशिका)] |
| स्वामित्वधन | royalty | .. [क. ६ क (१)] |

# THE OILFIELDS (REGULATION AND DEVELOPMENT) ACT, 1948

# तेलक्षेत्र (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| bore-hole | विधणविवर .. | [ S. 6 (*f*) ] |
| boring | विंधणकाम .. | [ S. 6 (*f*) ] |
| conservation | संरक्षण .. | [ S. 6 (1) ] |
| core | क्रोड भाग .. | [ S. 6 (*f*) ] |
| drilling | विंधण करणे .. | [ S. 6 (*d*) ] |
| exploring licence | समन्वेषण लायसन .. | [ S. 3 (*d*) ] |
| lessee | पट्टेदार .. | [ S. 3 (*a*) ] |
| lessor | पट्टाकार .. | [ S. 3 (*a*) ] |
| licensee | लायसनधारक .. | [ S. 3 (*a*) ] |
| licensor | लायसनदाता .. | [ S. 3 (*d*) ] |
| merchantable | विक्रययोग्य .. | [ S. 3 (*d*) ] |
| mineral oils | खनिज तेले .. | [ S. 3 (*c*) ] |
| mining lease | खाणकाम पट्टा .. | [ S. 3 (*d*) ] |
| oilfield | तेलक्षेत्र .. | [ S. 3 (*e*) ] |
| plugging | प्लग करणे .. | [ S. 6 (*d*) ] |
| prospecting licence | पूर्वेक्षण लायसन .. | [ S. 3 (*d*) ] |
| redrilling | पुन्हा विंधण करणे .. | [ S. 6 (*d*) ] |
| resources | साधनसंपत्ती .. | [ (Preamble) ] |
| royalty | स्वामित्वधन .. | [ S. 6A (1) ] |
| shaft sinking | कूपकांचे खोदकाम .. | [ S. 6 (*f*) ] |
| winning | नमुन्यादाखल निष्कर्षिणे .. | [ S. 3 (*d*) ] |
| working | व्यापक प्रमाणावर खाणकाम करणे . | [ S. 3 (*d*) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई